


(वर्ष ९३) पौष ते फाल्गुन शके १९४२ - जानेवारी ते मार्च २०२१ (संयुक्तांक ४ ते ६)

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १) | संपादकाचे बोल / वृत्तनिवेदन | १ |
| २) | गुरुवर्य श्री. भाईचे प्रवचन | ६ |
| ३) | सद्गुरु श्री. दादाभाईचे प्रवचन | १३ |
| ४) | परमप्रिय सद्गुरु श्री. भाईच्या प्रवचनांतील अमृत-कण | २६ |
| ५) | विनंती | २७ |
| ६) | उत्सव - महोत्सवांतील कार्यक्रम | २८ |
| ७) | शोकवृत्त | ३३ |
| ८) | महत्वाच्या सूचना | ३४ |
| ९) | निवेदन | ३५ |
| १०) | मंगलाचरण | ३६ |

।। श्री सद्‌गुरु प्रसन्न।।



- संपादकाचे बोल -

(वर्ष ९३) जानेवारी ते मार्च २०२१ (संयुक्तांक ४ ते ६)
आश्विन ते मार्गशीर्ष शके १९४३

आर्या

*'ब्रह्मा, विष्णु, महेशा। तुमची आहोत दत्तजी बाळे ।*
*जतन करा सर्वस्वे । देऊनि सद्‌भाव मृत्यूसि आळे'।।*
*'यशवंत' नाम तुम्हा यशगुण तुमचाच द्यावया लावी ।*
*यश गाता यश लाभे दासां जे भक्तिपंथही दावी ।।*

टाळेबंदीच्या काळात सर्वच जनता भयभीत झाली होती. पण सद्गुरुंनीच त्यांना पाठबळ दिले व हळूहळू सर्व व्यवहार पूर्वपदावर येऊ लागले आहेत. सद्गुरुंच्या कृपेने सर्व सुरळीत होईल व मंदिरात त्यांना दर्शनाचा लाभ मिळेल ही आशा आहेच. त्या काळात त्यांनी अल्पशी का होईना सेवा करवून घेतली व ठराविक सद्भक्तांनी धैर्याने व आनंदाने पार पाडली ह्याचा सार्थ अभिमान आहे. आता सद्भक्तीचा ९३वा अंक सुपुर्द करताना मनाला एक प्रकारची उभारी आली आहे. सद्गुरु सर्वांना ती देतीलच व शतकापर्यंत हा अंक पोहोचलेच हा विश्वास आहे.

— वृत्तनिवेदन —

## आश्विन, कार्तिक मार्गशीर्ष - ऑक्टोबर ते डिसेंबर २०२० मधील गोषवारा

शनिवार दि. १७.१०.२०२० (आश्विन शुद्ध प्रतिपदा) रोजी घटस्थापना होती. प्रात: स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना करण्यात आली. प्रतिपदा ते नवमी पर्यंत सायंकाळी ५ वाजता नवरात्रौपासना, दुर्गास्तोत्र व 'कलौ चंडी विनायकौ'चे वाचन करण्यात येते. पण लॉकडाऊनमुळे सर्व स्थगित करण्यात आले. रविवार दि. २५.१०.२०२० (आश्विन शुद्ध दशमी) रोजी विजयादशमी दसरा होता. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना करण्यात आली. त्याचवेळी गुरूपादुकांस एकादशणी करण्यात आली. लॉकडाऊनमुळे ठराविक सद्भक्तांच्या उपस्थिती एकादशणी सकाळीच होत होती. ह्याच दिवशी सद्भक्ती प्रसारक मंडळीचा वाढदिवस होता. एकादशणीच्या वेळी (१) माझी देवपूजा, देवपूजा (२) मनोभाव जाणुनि माझा व इतर पदे आणि शेवटी (३) नवविधा भजन घडो । तुझिय स्वरूपी प्रीति जडो ही प्रार्थना म्हणण्यात आली. त्यानंतरचे सर्व कार्यक्रम टाळेबंदीमुळे रद्द करण्यात आले.

यानंतर गुरुवर्य श्री भाईंचा पुण्यतिथोत्सव असतो शुक्रवार दि.

३०.१०.२०२० रोजी (आश्विन पौर्णिमा - कोजागिरी पौर्णिमा होती पण टाळेबंदीमुळे श्री कृष्ण भक्तीवर पदें व रासलिलाभिनयाचा कार्यक्रम रद्द करण्यात आला.

मंगळवार दि. ३.११.२०२०ला (आश्विन वद्य तृतीया) गुरुवर्य श्री भाईंचा व श्री बाळेकुंद्री महाराजांचा पुण्यतिथीदिन होता. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना झाली. त्यानंतर सकाळीच काही ठराविक सद्भक्तांच्या उपस्थितीत गाभाऱ्यांतच एकादशणी करण्यात आली. त्यावेळी (१) माझी देवपूजा, देवपूजा (२) मनोभाव जाणुनि माझा व काही पदे व नंतर (३) टाकियला निजभारा रामा ही प्रार्थना म्हणण्यात आली. गुरुवार दि. १२.११.२०२० (आश्विन वद्य द्वितीथा)ला गुरुद्वादशी होती. प्रात: स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना करण्यात आली व लगेच गाभाऱ्यात गुरुपादुकांस एकादशणी करण्यात आली. त्यावेळी काही सद्भक्त उपस्थित होते. त्यावेळी (१) माझी देवपूजा, देवपूजा (२) मनोभाव जाणुनि माझा आणि शेवटी प्रार्थना करण्यात आली. रात्रौ पालखी, मिरवणूक पण रद्द करण्यात आली. फक्त श्री रामेश्वर मंदिरातून पालखी सद्भक्ती मंदिरात आली व देवांची दृष्टभेट झाली व कार्यक्रम समाप्त झाला. मंगळवार दि. १४.११.२०२०ला (आश्विन वद्य चतुर्दशी) नरक चतुर्दशीचा श्री रामेश्वर मंदिरता होणारा 'उद्धव-गोपी' गीताचा कार्यक्रम पण लॉकडाऊनमुळे होऊ शकला नाही. पण सद्भक्ती मंदिरांत काही भक्तजनांनी ह्या कार्यक्रम पूर्ण केला.

गुरुवार दि. १६.११.२०२० रोजी (कार्तिक शुद्ध प्रतिपदा) बळीप्रतिपदा होती. सकाळी ७ वाजता प्रात: स्मरणानंतर गाभाऱ्यातच एकादशणी केली गेली. त्यावेळी (१) माझी देवपूजा, देवपूजा (२) मनोभाव जाणुनि माझा व शेवटी (३) मागता भिकारी झाली तुझे द्वारी ही प्रार्थना म्हणण्यात आली.

बुधवार दि. २५.११.२०२० (कार्तिकी एकादशणी - प्रबोधिनी एकादशी) होती. प्रात: स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना करण्यात आली. रविवार दि. २९.११.२०२०ला (कार्तिक शुद्ध चतुर्दशी) गुरुवर्य श्री भाईंचा अस्थिविसर्जन दिन होता. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना झाली व लगेच काही भक्तवृंदांच्या उपस्थितीत गाभाऱ्यांतच एकादशणी करण्यात आली. (१) माझी देवपूजा, देवपूजा (२) मनोभाव जाणुनि माझा व शेवटी (३) अर्पियला निज प्राण देवा ही प्रार्थना म्हणण्यात आली. रात्रौ कमळे वाहण्याचा कार्यक्रम रद्द करण्यात आला. सोमवार दि. ३०.११.२०२० (त्रिपुरारी पौर्णिमा). त्या दिवशी सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना केली गेली. पण पालखी मिरवणूक होऊ शकली नाही.

सोमवार दि. ७.१२.२०२० (कार्तिक वद्य सप्तमी) श्री काळभैरव जयंती होती. प्रात: स्मरणानंतर स्तवन व प्रार्थना केली गेली. रविवार १३.१२.२०२० (कार्तिक वद्य त्रयोदयी) श्री ज्ञानेश्वर महाराज पुण्यतिथी दिन होता. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना करण्यात आली. गुरुवार दि. २४.१२.२०२० (मार्गशीर्ष शुद्ध दशमी) श्री निरंजन रघुनाथ स्वामी महाराज पादुका स्थापना दिन होता. प्रात: स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थने नंतर गाभाऱ्यातच एकादशणी केली गेली. त्यावेळी ठराविक सद्भक्त उपस्थित होते. त्यावेळी (१) माझी देवपूजा, देवपूजा (२) मनोभाव जाणुनि माझा आणि शेवटी (३) आले हो रघुनाथ मंदिरी आले ही प्रार्थना झाली.

शुक्रवार दि. २५.१२.२०२० (मार्गशीर्ष शुद्ध एकादशी - मोक्षदा एकादशी) श्री गीता जयंती होती. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना केली. १० वाजता गीतापठण मात्र झाले.

शुक्रवार दि. २५.१२.२०२० रोजी नाताळ होता. श्री येशू ख्रिस्त

जयंती होती. सकाळी स्तवन व प्रार्थना झाली. मंगळवार दि. २९.१२.२०२०ला (मार्गशीर्ष पौर्णिमा) श्री दत्तजयंती होती. सकाळी प्रात: स्मरणानंतर स्तवन व प्रार्थना झाली. नंतर गाभाऱ्यातच काही सद्भक्तांच्या उपस्थितीत एकादशणी करण्यात आली. त्यावेळी (१) माझी देवपूजा, देवपूजा (२) मनोभाव जाणुनि माझा व (३) दत्त गुरुराज, दत्तमहाराज ही प्रार्थना म्हणण्यात आली. सायंकाळी ६ वाजता जन्मोत्सव काही सद्भक्तांनी साजरा केला. त्यावेळी (१) हा परमसनातन विश्व भरुनि उरला । गुरु दत्तराज ऋषि कुळात अवतरला नंतर पाळणा (२) बाळा जो जो रे कुलभूषणा । श्री अत्रिनंदना ।। (३) गुण धरुनि आळविते जो । मुनिमानस रंजन जो जो ।। म्हणण्यात आले व नंतर (४) दत्त माझी माता, दत्त माझा पिता ही प्रार्थना म्हणून जन्मोत्सव संपन्न झाला. पालखी, मिरवणूक आपल्या मंदिरातर्फे व श्री रामेश्वर मंदिरापुरताच मर्यादित झाली.

: इति :

।। श्री सद्गुरुभ्योनमः ।।

# श्री गुरुवर्य
# श्री भाईंचे प्रवचन

२०.३.१९३१

श्री गणेशाची आरती :-

*"जयदेव जयदेव ॐकारा गणराया, जय सद्गुरुराया ।।"*

ह्या ॐकारामध्ये अ, उ, म आणि अर्ध मात्रा अशी अक्षरें आहेत. 'अ'कार म्हणजे निर्गुण स्वरूप. त्याला शिरो भाग 'मस्तक तव ताता' असे म्हटले आहे. कारण निर्गुण स्वरुप हे ब्रह्माचे मूळरूप आहे. त्या निर्गुण स्वरूपाचे द्योतक 'शिव' आहे. त्याला पर्वताच्या कन्येचा पति म्हणजे पार्वती पति असे नाव आहे. भजनाच्या आरंभी व शेवटी आपण त्याला नमन करितों, ते असे :- ***"नमः पार्वती पते हर हर महादेव"***, म्हणजे पार्वतीचा पति जो हर, महादेव त्याला नमस्कार असो. नमस्कार म्हणजे नमन, अर्थात् मन रहित होत्साते शिवाच्या पदी लीन होणे. ह्याचे कारण असे आहे की निर्गुणाच्या ठिकाणी गुण नसल्यामुळे त्याची स्तुति करता येत नाही. त्याच्या चरणी निःशब्द होणे हेच त्या शिवाचे स्तवन. लाटेला समुद्राशी ऐक्य करावयाचे असेल तर तिने समुद्रात लिन समरस

झाले पाहिजे. तद्वत् वृत्तीला स्वरुपाशी ऐक्य पावावयाचे असल्यास तिने स्वरूपाशी लीन-तन्मय झाले पाहिजे. म्हणून स्वरूपाचे ज्ञान झाल्यावर साधकाने स्वरूपाशी तन्मय होऊन रहावे :- ***"मी मजला पावून स्थिर तेथे राहूनि । कल्पनाही जाय जंव आपे आपलया ।।" "मिठी पडली चिन्मयासी। मीनली तन्मया ।।"*** ह्या 'अकारांत' म्हणजे निर्गुण स्वरूपात पार्वती म्हणजे शुद्ध सत्त्वगुणी माया गुप्त असते. म्हणून शिवाची पूजा झाल्यावर भटजी पार्वती जी त्या स्वरूपात गुप्त असते. तिला हळदीकुंकू बाजूला वहावयास सांगतात.

नमः पार्वती पते हरहर महादेव म्हटल्यानंतर आपण ***"सीताकांत स्मरण जय जय राम"*** म्हणून शिवाने-निर्गुण ब्रह्माने "सीताकांत" असे जे सगुण रूप धारण केले आहे, त्याचे स्मरण करितो. शिवाच्या निर्गुण ब्रह्माच्या स्वरूपात जी पार्वती गुप्त होती, ती "सीताकांत" ह्या सगुण रूपांत प्रगट झाली. 'अकारा' मधून 'उकार' अशी शूंडाकार जी वृत्ती निघाली, तो 'सीताकांत' अपाणिपाद सगुण ईश्वर. अनादि निर्गुणब्रह्म शुद्धत्त्व गुणाच्या संयोगाने सगुण झाले :- ***"शिव पार्वती रुपे शोभसी ।।"*** ह्यालाच आदि नारायण म्हणतात. ह्याच्या मध्ये बोध देण्याचे सामर्थ्य आहे. जो मुमुक्षु ह्या अपाणिपाद सगुण ईश्वराचे स्मरण करितो, व त्याने रामकृष्णादि जे अवतार धारण केले त्यांच्या नाम लीला गातो व ऐकतो, त्याची तेणेकरून चित्तशुद्धि झाल्यावर त्यालाच हा अपाणिपाद भगवान स्वरूपाचा बोध करितो :- ***"त्यांना गुरु हरिच होऊनि अप्रयासें । देईल बोध परिपूर्ण वदेल ऐसें ।।"*** परंतु येथे हे लक्षात ठेवले पाहिजे की जरी भगवंताच्या अंगी बोध करण्याचे सामर्थ्य आहे, तरी तो अपाणिपाद असल्यामुळे त्याला त्या रूपाने बोध करिता येत नाही. यासाठी भगवान संताच्या देहाचा आश्रय करून बोध करण्याची कामगिरी करतो. म्हणून आपण ***"सीताकांत स्मरण जय जय राम ।।"*** असे म्हणून त्या अपाणिपाद भगवंताचे स्मरण करितो. तेणेंकरून

आपले चित्त शुद्ध होऊन त्याच्या कृपेने ज्ञान प्राप्त होऊन आपण मोक्षाचे अधिकारी होऊ :- *"ग्रासोग्रासीं राम स्मरण । तें अन्नचि होय ब्रह्मार्पण । भक्त भोगिती मुक्तपम । जाण निश्चिती विदेहा।।"*

आता आपण *"मकार विश्वाकार धरिसी जो पोटी ।।"* ह्या चरणाचा विचार करू. ॐकारामध्ये जो 'म' आहे त्याच्याबद्दल आपण एक टिंब-बिंदू देतो. हा बिंदू मायादर्शक चिन्ह आहे. हा बिंदू ॐच्या डोक्यावर दिला आहे ह्याचा अर्थ असा आहे की ज्या गुणमयी मायेचे दर्शक हे चिन्ह आहे. ती सर्व जीवांच्या डोक्यावर बसली आहे. ह्या मायेला म्हणजे 'अकार' ह्या निर्गुण ब्रह्माच्या तिसऱ्या स्वरूपाला 'धुंडीराज' म्हटले आहे. 'धुंडीराज' म्हणजे धोंडा. matter भौतिक द्रव्यें, ज्यांची चतुर्दश भुवनें-विश्व बनले आहे. या मायेचा असा प्रभाव आहे की जीवांची उत्पत्ती झाल्यावर हे सर्व तिच्या मोहपाशात पडले. परंतु जीव या मायेच्या मोहपाशात पडून दु:ख भोगतील म्हणून त्यांच्या दु:ख निवारणार्थ ईश्वराने रामकृष्णादि अवतार घेतले आणि त्यांचे गुण गायिले असता व कथा श्रवण केल्या असता त्यांचा उद्धार होईल अशी ह्यात शक्ती ठेविली. म्हणून या मायेतून तरून जाण्यास एकच उपाय आहे, तो हा की, *"दैवी ह्येषा गुणमयी मम माया दुरत्यया । मामेव ये प्रपद्यंते मायामेतां तरंति ते ।।"* (भ.गी. ७/१४) ही गुणमयी मायाच धुंडीराज म्हणजे जड विश्व बनली. ह्या जड विश्वरूपाचे द्योतक आहे. म्हणून त्या विश्वाकाराला - विश्वत्रिगुणाला आपण *"पुंडलिकवर दे हरि विठ्ठल"* असे म्हणून नमस्कार करितो. विठोबा सद्गुरुचें ही द्योतक आहे :- *"विटेवरी उभा कटेवरी हात । काय मौजेचा पंढरीनाथा ।।"* विठोबा विटेवरी म्हणजे ज्ञान विटेवर एक सारखा अठ्ठाविस युगें उभा आहे. परंतु प्रत्यक्षरितीने बोध करण्याचे सामर्थ्य त्याच्या अंगी नसल्यामुळे जगताच्या उद्धारार्थ नारद संकल्पास्तव श्री दत्तात्रयाच्या अवताराची योजना करण्यात आली. दत्त देवाचे विशेष हे आहे की तो स्मृति गामी असल्यामुळे

त्याला बोलविण्यासाठी आव्हान विसर्जनाची काही क्रिया करावी लागत नाही. त्याची आठवण केल्याबरोबर तो हजर होतो. म्हणून आपण भजनाच्या शेवटी जे प्रबंध म्हणतो, त्यात "श्रीगुरुदेव दत्त" ह्या प्रबंधाची गणना केली आहे. ॐकारांतली अर्धमात्रा हे ह्या दत्तात्रयाचे द्योतक आहे :- ***"आदेश आत्मा ।"*** बोध करणारा सद्गुरु हाच दत्तात्रय. म्हणून त्याला "गुरुदेव दत्त"–"जगद्गुरु" असे म्हणतात.

दत्तात्रय कसा बोध करितो ह्याचा आपण आता विचार करू. वर सांगितल्याप्रमाणे "मकार" विश्वाकार झाल्याने जीव मोहात पडले व नाना प्रकारची दु:खे भोगू लागले. त्यांचा उद्धार करण्यासाठी "उकार" शूंडाकार म्हणजे सगुण ईश्वराने यजुर्वेद निर्माण केला :- ***"यजुर्वेदें भजतां वारिसी भव ओझें ।।"*** यजुर्वेदांत ह्या अपाणिपाद भगवंताला कसें भजावे म्हणजे ज्ञान प्राप्त होते ह्याचे वर्णन केले आहे :- ***"अन्नं ब्रह्मेति व्यजानात् ।।", "प्राणो ब्रह्मेति व्यजानात् ।।" "मनो ब्रह्मेति व्यजानात् ।।", "विज्ञानं ब्रह्मेति व्यजानाते ।।" "आनंद ब्रह्मेति व्यजानात् ।।"*** अशा रीतीने स्थूल, सूक्ष्म, कारण व महाकारण या चारी देहांचा रिास करून ऋग्वेदानें ज्या प्रलय शेषाचें वर्णन केले आहे, त्या निर्गुण स्वरूपाचे - आत्म्याचे दर्शन होते. आता ऋग्वेदाचें प्रलय शेष म्हणजे काय हे समजले पाहिजे. चतुर्दश भुवनें हा विराटाचा स्थूल देह, तोच यजुर्वेदांतला जीवांचा स्थूल देह. अंत:करण, मन, बुद्धि, चित्त, अहंकार मिळून विराटाचा सूक्ष्म देह होतो. यासच महत्तत्त्व किंवा हिरण्यगर्भ म्हणतात. अविद्यामाया हा विराटाचा कारण देह आणि मूळमाया विराटाचा महाकारण देह. ह्या सर्वांचा निरास केल्यावर जें तत्त्व राहते, ते ऋग्वेदाचे प्रलय शेष. ज्या कल्पनेनें सृष्टीची कल्पना उद्भवली, त्याच अन्वयें ती जेथील तेथे निमाली. पृथ्वी जलात निमाली, जळ अग्नींत, अग्निवायूंत, वायू आकाशात, आकाश अहंकारात, अहंकारा महत्तत्त्वांत, महत्तत्त्व अविद्यामायेत, अविद्यामाया मूळ मायेंत

निमाली कारण गेले मूळ माया ब्रह्माच्या ठिकाणी लीन झाली. महाकारण गेले असे होता होता अंती जे भावरहित, अनंत, निराकार स्वरूप राहिले, ते शुद्ध चैतन्य.

ही ब्रह्माची जागृदवस्था 'अकार'–'प्रलयशेष' ह्या स्थितींत भगवान शेषावर पहुडलेले असतात. चैतन्याची जागृदवस्था, ती जीवांची निद्रावस्था होय. 'उकार' ही ब्रह्माची स्वप्नावस्था. ह्या अवस्थेंत "मी ब्रह्म आहे", "अहं ब्रह्मास्मि" अशी ब्रह्माचे ठिकाणी वृत्ती उठली. उदाहरणार्थ एक गृहस्थ उगाच बसलेला आहे, आणि तो मी आहे, मी आहे असे उगाच बोलू लागला तर तो स्वप्नात काही तरी बरळत आहे असे आपण म्हणतो. ज्याप्रमाणे जेथे काहीच नाही, तेथे "मी ब्रह्म आहे" अशी वृत्ती उठणे म्हणजे हे त्या शुद्ध चैतन्याचे स्वप्न होय. ह्या स्थितीत 'अकाराला' 'उकाराचे' रूप आले, निर्गुणब्रह्म सगुण ईश्वर झाला व त्याने जीवांच्या उद्धाराकरिता अवतार धारण केले. सारांश 'उकार' ही चैतन्याची स्वप्नावस्था होय.

पुढे 'मकार' म्हणजे चैतन्याची सुषुत्पावस्था त्या स्थितीत चैतन्याने विश्वाकार धारण केला. चैतन्याची सुषुप्तावस्था ती जीवांची जागृदवस्था. ह्या जागृदवस्थेंत सर्व जीव माया पाशात पडले. त्यातून त्यांना मुक्त करण्याकरिता त्या अपाणिपाद भगवंताने सद्गुरुचें व्यक्त रूप धारण केले:- ***"अर्धमात्रा तूर्या त्वच्चरणचि नाथा ।।"***, अर्थात तो सद्गुरुच्या द्वारे जीवांचा उद्धार करितो. तेव्हा 'अर्धमात्रा' हे सद्गुरुचें द्योतक आहे. ज्ञान प्राप्त झाल्यावर मुमुक्षु आत्मस्वरुप साक्षित्वाने पाहतो. पहाता, पहाता तो तन्मय होतो, म्हणजे ते अर्धवर्तुळ पूर्ण होते, अर्थात साक्षित्व लीन होऊन तो चैतन् रुपच होतो :- ***"शुद्धें मनें अनुभवा प्रति ये तथापि । तेव्हा पतंग मन होय चिदात्मदीपीं।।"*** तीन्ही देहांचा संबंध सुटल्यावर वृत्ति तन्मय होते, त्या स्थितीला शुद्धतूर्या म्हणतात :- ***"तूर्येची परिपक्वता । तेची उन्मनी अवस्था। निंबोळिया मधुरता । जैसी पक्व दशे ।।"*** दुसरी स्थिती शबल तूर्या. ही

अन्वय समाधी बाणल्यावर साधते :- ***"एवं चाले बोले उठे बसे । परी अन्वय समाधी लागला असे । जडचैतन्य ऐक्य समरसे । मानस त्या योगियांचें।।"***

कंसाकार अर्धमात्रा हे सद्गुरुंचे द्योतक आहे, आणि "त्वच्चरणचि नाथा" – सद्गुरुचे चरण हे सद्गुरुच्या शरीरात सर्वात अति पूज्य भाग होय. जसे गाईच्या सर्वांगात दूध आहे, पण ते तिच्या स्तनात मूर्तीमंत आढळते. तसे सद्गुरुच्या सर्व देहात सत्त्व आहे. पण मूर्तीमंत सत्त्व त्याच्या चरणाच्या ठिकाणी आढळते. ह्याला प्रमाण हेच आहे की शुद्धांत : करण झालेल्या मुमुक्षूने किंवा साधकाने जर सद्गुरुच्या चरणावर मस्तक ठेविले, तर त्याला सत्त्वाचे भरते येते. म्हणून सर्व संतांनी सद्गुरुच्या चरणाचाच महिमा वर्णन केला आहे :- ***"नारायण ध्यान चरणीं स्थान दान दीजे ।।" "स्मर हृदयीं गुरुराज पदा तूं । त्यजूनियां सर्व ही मानस किंतू ।।"*** वामन पंडित ही असेच म्हणतात :- ***"एक असोनि अनेक दिसे करितांचि समाधी वसे।।... श्री गुरुच्या चरणीं म्हणजे वामन लोळलियां सुख ते गवसें ।।"*** रामदास स्वामीही ह्याच चरणाची महती गातात :- ***"श्री गुरुचें चरण कंज हृदयीं स्मरावें।। निखिल निगम साधारण सुलभाहुनि सुलभ बहु । इतर योग याग विषय पंथि का शिणावें ।।"*** तसेच तुकाराम महाराज म्हणतात:- ***"सद्गुरु वांचूनि सापडेना सोय । धरावे ते पाय आधीं आधीं ।।"***

एकंदरीत सद्गुरुवांचून दुसऱ्या कोणालाही शरणागताला उपदेश करितां यावयाचा नाही, म्हणून सद्गुरुच्या उपदेशाला "आदेश आत्मा" असे म्हणतात. वेदरुपी पक्ष्याचें यजुर्वेद हे शिर आहे, ऋग्वेद व सामवेद दोन पंख, अथर्ववेद हे पुच्छ आणि गुरुचा उपदेश-आदेश हा त्याचा आत्मा आहे असे मानिले आहे. ***"अकार शून्याकार मस्तकतव ताता । ऋग्वेदीचे प्रलय शेषतत्त्वता ।।"*** असे आरतीच्या पहिल्या चरणात म्हटल्याप्रमाणे ज्या प्रलय शेषाचे ऋग्वेदांत वर्णन केले ते ब्रह्माचे निर्गुण स्वरूप होय.

जडभाग निरसल्यावर साक्षित्वाने जी आत्मता उरते, त्या निषेध शेषाचे वर्णन जयुर्वेदातर्गत भार्गवी-वारुणी विद्येंत ते ब्रह्माच्या सगुण स्वरूपाचे वर्णन होय. ह्या भृगृ-वारुणी विद्येच्या योगाने सगुण ईश्वराचे दर्शन झाल्यावर भव ओझे खाली उत्तरते :- ***"उकार शूंडाकार सगुणरुप तुझें । यजुर्वेदें भजतां वारिसी भव ओझे ।।"*** भवओझें म्हणजे त्रिगुणात्मक सृष्टींतील त्रिविध ताप. ह्या तापाचे निवारण होण्यासाठी आणि ऋग्वेदांतील प्रलय शेषाचें व यजुर्वेदांतील निषेध शेषाचे अनुभवजन्य ज्ञान होण्यासाठी सामवेदाने नाना तऱ्हेचे दृष्टांत देऊन सृष्टीच्या विश्वकाराच्या स्थिती काळाचे वर्णन करून अद्वैतच सिद्ध केले आहे :- ***"मकार विश्वाकार धरिसी जो पोटीं । त्याते सामवेद गाती जगजेठी ।।"*** परंतु निर्गुण ब्रह्म, सगुण ब्रह्म आणि विश्व त्रिगुण ब्रह्म ह्यांचे परोक्ष रीतीने ज्ञान झाले तरी सद्गुरुकृपेशिवाय त्यांचे अनुभवजन्य ज्ञान होणार नाही. जशी वृक्षाच्या शाखेकडे पाहता पाहता चंद्राची रेषा अकस्मात दृष्टीस पडते. तसा शुद्धसत्त्वदृष्टी झाल्यावर सद्गुरु कृपेने त्यांनी महावाक्याचे शब्द उच्चारिताच आत्मचंद्रमा ओळखिता येतो. म्हणून सर्व संतांनी सद्गुरुचीच महती गायिली आहे. ह्या करिताच प्रार्थना किंवा भजनाच्या शेवटी आपण "श्री गुरुदेव दत्त" असे म्हणतो.

**– नारायण –**

।। श्री सद्गुरुभ्योनमः ।।

# श्री सद्गुरु
# श्री दादाभाईंचे प्रवचन

बुधवार : २८.४.४३
संध्याकाळी : ५.४७ ते ७.३०

दोन दिवस भजनाबद्दल विवेचन झाले. तेव्हा भजन हेच मोक्षाचे सुलभ साधन आहे हे सिद्ध झाले. अद्वैतमताचे पुरस्कर्ते श्रीशंकराचार्य ते सांगतात 'मोक्षकारण सामग्र्यां भक्तिरेव गरीयसी' भक्ति म्हणजे प्रीति व भगवान हा प्रेमस्वरूप आहे. कारण भक्तिसूत्रात श्री नारद म्हणतात :- (अनिर्वचनीयं प्रेमस्वरूपं ।।) तेव्हा तो प्रेमानेच वश होणार. (उद्धवा, भक्तिला वश मी । भक्ती आकळिला दयाघन । प्रेमे आकळिला ।। गिरिधर प्रभू ।) श्रीतु. महाराजही तेच सांगतात :-

*भजन करा सावकाश । तुका झालासे कळस ।।*

काल जी प्रस्तावना वाचली त्यात सर्व सतांचे आधार देऊन हेच सांगितले आहे की सर्वांत भजन हेच सुलभ साधन. पण आता हे भजन कोणाचे करावे ? तर

*यो ब्राह्मणं विदधाति पूर्वं यो वै वेदांध प्रहिणोति तस्मै ।*
*तं ह देवमात्मबुद्धि प्रकाशं मुमुक्षुर्वे शरणमहं प्रपद्ये ।।*

ज्याने ब्रह्मदेवाला उपदेश केला त्या पुराण पुरुषाला - नारायणालाच

मुमुक्षुने शरण जावे किंवा त्याचे ते श्रीरामकृष्णादि अवतार त्यांचे भजन करावे आता कोणी म्हणतील की श्रीरा. परमहंसानी कालीमातेची उपासना केली पण त्यांना तोतापुरीला गुरू करावाच लागला. पण तोतापुरीपेक्षा तेच श्रेष्ठ होते . कारण त्यांना ज्ञानोत्तर भक्ति माहित नाही. म्हणून ज्ञान झाल्यावर श्रीरामकृष्ण जेव्हा टाळ्या वाजवून भजन करीत होते तेव्हा त्यांना विचारले की, काय रे भाकऱ्या भाजतोस का! परमहंस म्हणाले, "सद्गुरुराज, माझी थट्टा करता का?" पण त्यांना भक्त गौणीभक्तिच माहित होती. नंतरचे जे दास्य, वात्सल्य व माधूर्यरस ते त्यांना माहित नव्हते. त्यांना भक्तिचे अंग नव्हते आणि म्हणूनच श्री वा. पंडित म्हणतात–

*आत्मा सर्व जडप्रकाशक असे लोकी बहु जाणती ।*
*जाणोनि श्रुतकीर्तनादि सगुण प्रेमा मनीं नेणती ।।*
*कोणी ते सगुणीच निष्ठ परि हा आत्मा प्रिय श्रीहरि ।*
*ऐसें भक्ति रहस्य नेणती परी सद्भक्ति दोही परीं ।।*

सद्भक्ति म्हणजे

*निर्गुणज्ञान सगुणभक्ति । परमपुरुषार्थ सगुणमुक्ति ।*
*ऐसी गीता भगवदुक्ति । सार सकळां वेदांचे ।। (वा.प.)*

आपण व ईश्वर कधीही एक होणार नाही ही पशूतुल्य भक्ति आहे. ज्या जिज्ञासूला अद्वैताचा अनुभव नाही पण तो म्हणतो की ते निगम सिद्ध खरे आहे व ते मला प्राप्त व्हावे म्हणून ईश्वराची पुढीलप्रमाणे प्रार्थना करतो त्याला सद्गुरुकृपेने त्या निर्गुणस्वरूपाची प्राप्ती होते.

*अद्वैत हे निगमसिद्ध खरें तथापि ।*
*नाहीं मला अनुभव स्वसुखस्वरुपीं ।।*
*तो ईश्वरा मज घटो म्हणवुनि देवा ।*
*जिज्ञासु सेवइल तयांसी फळेल सेवा ।। (वा.प.)*

विठोबाने नामदेवाला सांगितले की, मी जरी तुझ्याशी बोलतो, खेळतो, नाना लीला करतो तरी माझे हे मायीकरूप आहे. जे ह्या चर्मचक्षूला दिसते

ते सर्व खोटे आहे.

*यद्दष्टं तन्नष्टं । जे दृगोचर ते नसे गुरु असा निर्धार सोडूं नको ।। (ना.म.)*

माझे खरे जे निर्गुणरुप त्याची प्राप्ती पाहिजे तर विसोबा खेचराचे चरण धरले पाहिजे. गुरुशिवाय माझे हे रूप कळणार नाही.

*सहज केवळ ते न तुम्हां कळे । बहुत तर्कबळेहिन आकळे ।।*
*गुरुमुखाविण ते नकळे गती । म्हणुनी बोलती वेत तिरी श्रुती ।।*
*(वा.पं.)*

*तद्विज्ञानार्थ स गुरुमेवाभिगच्छेत्समि त्पाणि: श्रोतियं ब्रह्मनिष्ठम्: ।*
*आचार्यवान्पुरुषो वेदेति । (श्रुति.)*

*तस्मादगुरुं प्रपद्येत जिज्ञासु: श्रेय उत्तमं । शाब्दे परे च निष्णांत*
*ब्रह्मण्युपशयाश्रयम ।। (श्री भागवत)*

*तद्विद्वि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया ।*
*उपदेक्ष्यंति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिन: ।।*

*सद्गुरुवांचोनि सापडेना सोय । धरावे ते पाय आधी आधी ।।*
*(श्रीतुं. म.)*

साक्षात्कार पाहिजे तर सर्व सोडून गुरुचरण हे धरलेच पाहिजेत. त्याशिवाय कोणाला साक्षात्कार झाला नाही व पुढेही होणार नाही. पण ह्या सर्वाला मूळ भजन आहे. भजनानें भगवद्कृपा होते व मग

*पूर्ण करितां भगवद्भक्ति । गुरुभजनासी अधिकार प्राप्ती ।*
*सद्गुरुमहिमा सांगो किती । मी आज्ञावर्ती श्रीगुरुचा ।।*
*गुरु ज्यावरी अनुग्रहो करी । त्यासी मी भगवंत उद्धरी ।*
*आदरें वाहोनिया शिरीं । निजऐश्वर्यावरी बैसवी ।। (ए.भा.)*

भगवान म्हणतात की गुरुभक्ताला मी माझ्या आसनावर नेऊन बसवितो. मी जनन्माता, जगत्पिता आहे तेव्हा माता व पिता जसे बालकाचे कौतुक करतात तसे मी त्याचे करतो. हे सुख अद्वैतात नाही म्हणून आचार्य म्हणतात :–

*"मोक्षकारणं सामग्र्यां भक्तिरेव गरीयसी ।"*

पण त्याच्यावेळी कर्मठ लोक पुष्कळ होते. त्यांना हे पटणार नाही. म्हणून त्यांनी 'ज्ञानादेवं तू कैवल्यम्' हाच सिद्धांत पुढे मांडला.

*गुरु परमात्मा परेशु । ऐसा जयाचा विश्वासु ।*
*त्याचा अंकित मी हृषीकेशु । जो जगदीशु जगाचा ।।*

अशाप्रमाणे गुरुच ईश्वर असे ज्याचे गुरुवर प्रेम आहे त्याचा भगवान म्हणतात मी उद्धार करतो.

पण ही गुरुभक्ती होण्यास प्रथम ईश्वरभक्ती केली पाहिजे. भगवद् भक्तीची पूर्णता म्हणजे ज्ञान. त्याला बोधपुत्र म्हणतात. मग हा गुरु होतो. मग गुरुभक्तीला सुरूवात होते. म्हणून प्रत्येक संत हा गुरु नाही. गुरु म्हणजे भगवंताने आपले ते Instrument केले पाहिजे. संत स्वत:चाच उद्धार करतात. पण गुरु अनेक जीवांचा उद्धार करतो. गुरुत मुख्य दयाळूपणा पाहिजे. प्रत्येकाच्या उद्धाराबद्दल त्याला तळमळ लागली पाहिजे. तसे नसेल तर तो गुरुपदाला अनधिकारी आहे.

*गुरु हा संतकुळीचा राजा । गुरु हा प्राण विसावा माझा ।*
*गुरुवीण नाही दुजा । देव पाहता त्रैल्योक्यीं ।।ध्रु.।।*
*गुरु सत्यालागी साह्य । गुरु साधकांची माय ।*
*गुरु सुखाचा सागर । गुरु प्रेमाचा आगर ।*
*गुरु धैर्याचा डोंगर । कदाकाळीं ढळेना ।।१।।*
*गुरु सत्यालागी साह्य । गुरु साधकांची माय ।।*
*गुरु कामधेनु गाय । भक्तां घरी दुभतसे ।।२।।*

साधकाला गुरु म्हणजे माऊलीच. त्याचे संगोपन कसे करावे हे एक त्यालाच समजते. शिष्यांना पुत्राप्रमाणे वागविणारी ती गुरुमाऊलीच. म्हणून ज्ञानेश्वराय ज्ञानेश्वरमाऊली म्हणत –

*गुरु घाली ज्ञानांजन । गुरु दाखवी निजधन ।*

*गुरु सौभाग्य देऊन । स्वात्म बोधें नांदवी ।।३।।*

*गुरु वैराग्याचे मूळ । गुरु परमात्मा केवळ ।*

*गुरु सोडवी तात्काळ । गाठ लिंग देहाची ।।४।।*

वैराग्य हे गुरुशिवाय मिळणार नाही. ज्याची विषयांच्या ठिकाणी पूर्ण विरक्ती आहे व भगवंताची अत्यंत आसक्ती आहे तोच दुसऱ्यात ती उत्पन्न करू शकेल. गुरु हा केवळ कृपावलोकनानें चिद्चिद्ग्रंथीचा छेद करतो.

*काया-काशी गुरु उपदेशी । गुरु तारक ब्रह्म आम्हांसी ।*

*बापविठ्ठल रखुमाईसी । ध्यान मानसी लागले ।।५।।*

श्रीज्ञानेश्वर म्हणतात मला त्याचे निरंतर ध्यान लागो. असे असताना ते गुरु नको असे कसे सांगतील? असो.

अशा रीताने ईश्वराचे भजन केले असता त्याची कृपा होते व मग तो आपली व गुरुची भेट करून देतो. इतर संत जरी भेटले तरी साक्षात्कारासाठी गुरु केलाच पाहिजे. त्याच्याकडून ज्ञान प्राप्त झाल्यावर मग गुरु भक्तीला सुरूवात होते.

*गुरुपासोनि घ्यावे ज्ञान । मग तो ईश्वर म्हणोनि त्याचे भजन ।*

*त्या भजने बाणतसे समाधान ।*

*जे उपदेशिले ते ज्ञानचि बिंबते श्रुति म्हणे ।। (वं.दी.)*

*यस्य देवे पराभक्तीर्यथा देवे तथा गुरौ ।*

*तस्येते कथितां ह्यर्था प्रकाशते महात्मन: ।। (श्रुति)*

गुरु ईश्वर असे समजून त्याची सेवा केली असता त्याने दिलेले ज्ञान बाणते परिपक्व होते. असा हा एकंदर उपक्रम आहे. पण सर्वाच्या मुळाशी भगवद्भजन आहे व ते कसे करावे हे काल सांगितले. ते एकाग्रतेने तन्मयतेने झाले पाहिजे.

*मच्चिता मद्गतप्राणा बोधयंत: परस्परम् ।*

*कथयंतश्च मां नित्यं तुष्यंतिच रमंति च ।। (भ.गी.)*

त्यांचे चित्त, प्राण माझ्याकडेच लागतात. अर्थात ते विदेहस्थितीत

असतात मग एकमेकांना ते जागे करतात. ते माझ्याच कथा करतात. मी व माझ्या कथा निराळ्या नाहीत मी कथेत हजर असतोच.

*नाहं वसामि वैकुंठी योगिनां हृदये रवौ ।*
*मद्भक्ता यत्र गायंति तत्र तिष्ठामि नारद ।।*
*तुका म्हणे यासी कीर्तनाची गोडी ।*
*प्रेमे घाली उडी नामासाठी ।।*

त्या कथेतच त्यांची तुष्टीपुष्टी होते. भगवंताच्या अवताराचा हेतू ह्याच की त्याच्या नामलीला गाऊन जगताने आपली उद्धार करून घ्यावा.

*जन्म कर्मच मे दिव्यमेवं यो वेति तत्वत: ।*
*त्यत्व: देहं पुनर्जन्म नैति मामेति सोऽर्जुन ।।*

भगवान म्हणतात माझे जन्म कर्म सर्व अलौकिक आहे. (जन्माला न येता आले, मी अरुप असताना सर्व लीला केल्या) व निजधामाला न जाता गेलो हे सर्व जो अनुभवेकरून जाणतो (ज्याला माझ्यासारख्या अनुभव आहे) त्याला पुनर्जन्म नाही. तो, मी जो सगुण ईश्वर त्यालाच येऊन मिळणार. तेव्हा भगवंताने अवतार का घेतला तर त्याचे जन्मचरित्र व्हावे व ते जो प्रेमाने हावभाव करून दाखवील त्याला भगवंताची प्राप्ती होईल. भागवतात ह्याचे वर्णन केले आहे ते असे :–

*श्रुण्वन्सुभद्राणि रथा:ङ्ग पाणेर्जन्मानि कर्माणि च यानि लोके ।*
*गीतानि नामानि तदर्थ कश्नि गायत्विलज्जो विचरेदसङ्ग: ।।*
*एवंव्रत: स्वप्रियनाकीर्त्या जातानुरागो दुतचित उच्च: ।*
*हसत्यथो रोदिती रौति गायत्युमादवन्नृत्पति लोक बाह्य: ।।*

लोक समजतात ह्याला वेड लागले. ह्याच्या अंगात कसले वारे आहे. पण हे वारे कोणाचे? तर

*देव जाणे हा भाव सखे माझा ।*
*जिवी जडला सप्रेम रामराजा ।।१।।*

*आंगी भरले माझिया रामवारे ।*
*रामरुपीं रंगले चित्त सारे ।।२।।*

सीता आपल्या सखीला सांगते की श्रीरामरायांना पाहताच माझी जी ही स्थिती झाली ती एक रामचंद्रप्रभूच जाणू शकतील. येथे सर्व भूपति बसले आहेत खरे पण मला श्रीरामाशिवाय कोणीच दिसत नाही.

*आजि पुरली तहान डोळियांची ।*
*मूर्ती पाहता । श्रीरामराजयाची ।।३।।*

आज माझ्या डोळ्याचे पारणे फिटले श्रीरामाचे मुख पाहिल्यावर आणखी कोणाचे मुखावलोकन करावेसे वाटत नाही. तेथे जे सुख आहेते इतरत्र कोठेच नाही.

*काय सांगू हा लाभ थोर झाला ।*
*गीता गाता आनंदतनय धाला ।।४।।*

आनंदतनय म्हणतात की हे गीत असता माझी वृत्ती स्वरूपात लीन झाली मी आनंदमय झालो. हे सर्व भक्तीचे सोहळे आहेत. ह्या लीला गायिल्या ऐकिल्या असता अंत:करण शुद्धि होईल. म्हणून आज थोड्याशा लीला करू. Practical झाले पाहिजे. नाहीतर

नळी फुंकिली सोनारें । इकडून तिकडून गेले वारे

असे होईल. भजन नृत्य कीर्तन कसे करावे हे प्रथम सांगून ठेवतो. मग तसे केल्यावर जर कोणाला फळ आले नाही तर आम्ही त्याला जबाबदार असो.

श्रीकृष्णाने शेवटपर्यंत लीला केल्या पण त्यात बाललीला जास्त महत्त्वाच्या आहेत. गोपींच्या उद्धारासाठीच भगवंताचा अवतार झाला. कारण गोपी म्हणजे श्रुति. तेव्हा बालपणापासून त्यांच्याशीच लीला केल्या. गोपीकडे लोणी चोरायला नेहमी जात. लोणी म्हणजे शुद्ध प्रेम. भगवान प्रेमस्वरूप आहे. तेव्हा तो प्रेमालाच ओढणार. गोपी आपल्या शुद्धप्रेमाने

त्याच्याकडे ओढल्या जात. भगवंताला तेच पाहिजे होते. गोपी स्वाधीन आल्या म्हणजे त्यांना उपदेश करायला वेळ लागणार नाही. शिवाय सर्व गोपींची तयारी करून त्यांना एकदम बोध द्यावयाचा होता. गुरु तरी असेच करतो. शिष्याची पूर्ण श्रद्धा झाली तरच बोध होईल. एखादा obstinate येऊन बसला तर त्याला रडविण्याचे काम आमचे नाही ते यमाजी भास्करांचे ईश्वर दाखवा म्हणून म्हणतात. पण ते काही खायचे काम नाही.

एका पाद्रीकडे एक तरुण गेला व म्हणाला प्रभू येशु ख्रिस्ताने एवढे चमत्कार केले तुम्ही एखादा तरी दाखवाल का! त्याने त्याच्या जोराने कानफटात मारली तो लगेच अंगावर धावून आला व म्हणाला हे काय? हा कसला चमत्कार? पाद्री म्हणाला. तू न रागवता मुकाट्याने घरी गेला असता तर तो चमत्कार झाला असा. प्रभूला क्रूसावर चढविले त्यावेळी त्यांनी काय उद्गार काढले की, God forgive them, for they do not know what they are doing ते अवतारी पुरुषच तू तर सामान्य आहेस. तुला काय चमत्कार दाखविणार? असो.

भगवंताच्या लीला सामान्य दिसतात. पण त्यात परमार्थाचे रहस्य आहे. 'गोपी वस्त्रहरण' वर वर पाहता विचित्र वाटते. पण त्यात पारमार्थिक गूढ रहस्य आहे. वस्त्र म्हणजे हे स्थूळ, सूक्ष्म, कारण, महाकारण हे चार देह. ह्या चार देहाच्या पलीकडे गेल्याशिवाय आत्मदर्शन होणार नाही. गुरु प्रत्येकाला असे नग्न करतो. आत्म्यावरची ही पांघरुणे काढली म्हणजेच तो दिसेल. खरे स्थूळ व सूक्ष्म हे दोनच देह. पलीकडचे जे कारण शरीर ती एक स्थिती आहे. मी स्थूळ व सूक्ष्म देह नाही. पण मी कोण आहे हे समजत नाही तीच ही स्थिती –

*नेणे असे स्फुरण कारण तेच माया ।*
*जाणे तयासि म्हणति मुनि तेचि तुर्या ।।*

गुरुकृपेने ते अज्ञान गेल्यावर त्या स्थितीची जाणीव होते. मग मी

निर्गुण, निराकार, अचंचल स्वप्रकाश, आकाशासारखा सर्वगत, बोधरुप ज्ञानरुप असा मी आत्मा आहे हा अनुभव येतो. हीच तूर्यावस्था किंवा महाकारण शरीर ह्या पलीकडे आत्मा आहे.

*तो साक्षी रुप समजा भुवनांत जागा ।*
*साधा भजा नमुनि सद्गुरु राजयोगा ।। (ना.म.)*

मी आत्मा आहे हा अनुभव खवा पण तीही वृत्ती लीन झाला

*देहत्रयासि निरसा सदसद्विवेके ।*
*जाणीवही मग न राहील तेचि तीके ।।*
*विज्ञान जाणुनि त्यजा जड साक्षिभागा ।*
*साधा भजा नमुनि सद्गुरु राजयोगा ।। (ना.म.)*

चारी देहाच्या पलीकडे गेल्यावर मग जी अवस्था प्राप्त होते तिला उन्मनी अवस्था म्हणतात. ह्याच शिवसाक्षात्कार. जाणण्यात नेणण्यात जी स्थिती तीच आत्मखुण. भगवंताने ह्या गोपीवस्त्रहरण लीलेद्वारा त्यांना हा अनुभव दिला व सर्व वस्त्रे काढून त्यांनी चिदंबर दिले.

भगवंताचे चरित्र ज्ञानरुप आहे पण ते समजत नाही. कारण तसे सांगणारा कोणी भेटत नाही. स्वामी विवेकानंद म्हणतात जो कृष्णराज झाला आहे. ज्याचा कृष्ण हाच विषय झाला आहे त्यानेच ह्या रासलिलादि लीला वाचाव्या तरच आनंद मिळेल नाहीतर भलताच परिणाम होईल. They are meant for Bhaktas only असो आता श्रीकृष्णाच्या थोड्या लीला घेऊ –

गोपी ह्या श्रीकृष्णाबद्दल यशोदामातेकडे गाऱ्हाणी घेऊन येतात.

*१) कशी गत करू बाई या श्रीहरीला ।।धृ.।।*
*जात मी होते यमुनेच्या पाण्या । अडवितो हरी मजला ।।१।।*

ह्यात श्रीकृष्ण सांगतात की, सर्व सोडून माझे ध्यान कर. माझे ध्यान करीत करीत घागर घेऊन जा. गोपी ह्या श्रुती होत्या व भगंवताने त्यांचा उद्धार करण्याचे वचन दिले होते म्हणून त्याला ह्या लीला कराव्या लागल्या.

*निजले मी होते पतीसहशयनी । गाठ घाली दाढीवेणाला ।।२।।*

ह्यात काय दर्शविले की प्रकृतिपुरुष एकच आहेत मग निराळे कशाला झोपता? द्वैत सोडून द्या तरच एकररूप व्हाल.

*२) अग ऐक यशोदाबाई । तुझ्या हरीपुढे उपाय नाही कसे करूं? ।।धृ.।।*

*मी नाहात होते न्हाणींत । अवचत येऊनि उभा राहात ।।१।।*

स्नान करताना देखील माझे स्मरण करी. एक दिवस तो गेला म्हणजे रोज त्यावेळी त्यांना वाटे की आता कृष्ण येईल की काय? अशा निमित्ताने त्यांना त्याचेच ध्यान लागत असे. मग –

*यं यं वापि स्मरन्भावं त्यजत्यंते कलेवरम् ।।*
*तं तमेवैति कौंतेय सदा तद्भावभावित: ।।*

भगवंताने Practical करून दाखविले.

*माझी सून होती घरात । तिज पाहूनि नवरी म्हणत ।।२।।*
*धन्य धन्य गोपिका प्रेमा । कर जोडुनि विनवी नामा ।।३।।*

*३) यशोदे मूल नव्हे रंग हा ।। धृ.।।*

*मूल नव्हे रगसंग पुरे पुरे दंग केले आम्हांसी. तुला तवं चोज दिसे मानसी, सखे याचे लाड किती करिशी ।।१।।*

श्री ज्ञानेश्वरांनी येथे रुपक फार सुंदर केले आहे. यशोदा म्हणजे भक्ति. तिला ह्या गोपी म्हणजे वृत्ती श्रीकृष्णाबद्दल म्हणजे बोधपुत्राबद्दल गाऱ्हाणी सांगतात, की हा तुझा पुत्र आम्हास ह्या गोकुळात राहायलाच देत नाही.

*वृत्ति जिकडे दाव तिकडे न जावे ती पाठी ।*
*साक्षी होऊनि पाहता स्वरुपी मग होय भेटी ।।*

वृत्ती उठल्या की त्या नाहीशा करण्यास त्या ब्रह्मरुप केल्या पाहिजेत.

*लोकीं जेवी जारिणीतें । भर्ता टपतो जेथे तेथे ।*
*तेवी किंचित् स्मरता चित्ते । ब्रह्मभावे झडपावे ।।*

*ऐसा कल्पनेचा मारा । करितां विरती हृश्यगारा ।*
*जैसा थिरळे पसारा । प्रचंड पवनें मेघाता ।। (शांतीसागर)*
*गोरसधरीं गोपगृहीं चोरितो । रात्रींचा येऊनियां शीरतो ।*
*मुलींते आवळून धरितो । नये बोलूऐसी कामें करितो ।।२।।*
*नुतनवधू सुंदर सगम हा । तष्कर षट् जार पुरंदर हा ।*
*करी चुरी स्त्री कुचनंदर हा । तवात्मज निर्गुणमंदिरा हा ।।३।।*
*आता बाई गोकुळी वास पुरे । पुरे पुरे केले तुझ्या कुमरे ।*
*तयांसि साम्य नसे दुसरे । हे गुज कथिलें श्रीगुरुज्ञानेश्वरें ।।४।।*

ही सर्व गाऱ्हाणी ऐकून झाल्यावर यशोदी गोपींना सांगते :–

*बाळ सगुण गुणाचे तान्हे ग । बाळ दिसते गोजिरवाणे गे ।।*
*काय सांगता गाऱ्हाणे गे । गोकुळीच्या नारी ।।१।।*
*श्रीरंग माझा वेडा गे । याला नाही दुसरा जोडा गे ।*
*तुम्ही याची संगत सोडा गे । गोकुळींच्या नारी ।।३।।*
*सावळ गे चिमणा माझा गे । गवळणींत खेले राजा गे ।*
*तुम्ही मोठ्या ढालगजा गे । गोकुळींच्या नारी ।।४।।*
*तुम्ही खाऊन लोण्याचा गोळा गे । आळ घेता या गोपाळा गे ।*
*तुम्ही ठाईंच्या वोढाळा गे । गोकुळींच्या नारी ।।५।।*
*तुम्ही लपवूनी याची गोटी गे । लागता गे याची पाठी गे ।*
*ही एवढीच रीत खोटी गे । गोकुळींच्या नारी ।।६।।*
*तुम्ही लपवून याचा भवरा गे । आळ घेता शारंधरा गे ।*
*तुम्ही बारा घरच्या बारा गे । गोकुळींच्या नारी ।।७।।*
*हा ब्रह्मविधीचा जनीता गे । तुम्ही याला धरू पाहाता गे ।*
*हा कैसा येईल हाता गे । गोकुळींच्या नारी ।।८।।*
*नामा म्हणे यशोदेसी गे । हा तुझी हृषिकेशी गे ।*
*किती छळितो आम्हासी गे । गोकुळींच्या नारी ।।९।।*

या सर्व गोपी निघून गेल्यावर श्रीकृष्णाला म्हणते :–

*काय उणे का कितोसी चोरी । किती सांगू तू नायकसी हरी ।।*
*परेपरता तू पळोनी जारी दूरी ।*
*अनावर या लौकिका बाहेरी वो ।।१ ।।*
*माया करुणा हे करिते बहुत । किती सोसू या जगाचे आघात ।*
*नपुरे अवसरू हेंचि नित्यानित्य ।*
*तूंचि सोडवी करूनी स्थिर चित्त वो ।।२ ।।*
*बहुत कामे मी गुंतलीसे घरी । जासी डोळा तू चुकवूनी हरी ।*
*करितां लाग न येसी चपळ भारी ।*
*नाही सायासाची उरों दिली उरी वो ।।३ ।।*
*तुज म्हणिये मी न संगे अनंता । नको जाऊं या डोळिया परता ।*
*न लगे जोडी हे तुजवीण आता ।*
*तुकया स्वामी कान्होबा गुण भरितो वो ।।४ ।।*

श्रीकृष्णाला, तू बाहेर जाऊ नकोस असे सांगत असताही ती घरकामात गुंतली असे पाहून श्रीकृष्ण पळून जातो तेवढ्यात ती त्याला हाक मारते पण तो कोठेच दिसत नाही. मग ती म्हणते :–

*माझा कृष्ण देखिला काय । कोणीतरी सांगा हो ।।*

इतक्यात श्रीकृष्ण हातात काठी घेऊन धावत येऊन आईला मिठी मारतो. पण यशोदा तीच काठी घेऊन म्हणते :–

*हाती घेऊनिया काठी । माता शिकवी श्रीपती ।*
*यमुनेची माती खासी कां कां कां ?*
*विष्णुदास नामा म्हणे । मरुनिया जन्मा येणे ।*
*कृष्ण सनातन पाहू या या या ।।५ ।।*

हे जन्ममरण चुकविण्याची सर्वांची खटपट आहे. पण हे म्हणतात पुन्हा पुन्हा जन्मास यावे व श्रीकृष्णाच्या मुखाचे अवलोकन करीत राहावे.

यशोदा मारण्यास काठई घेताच श्रीकृष्ण म्हणतो :–

*आई ग मजला मारूं नको ।*
*नाही नाही म्या खादलि माती ।।धृ.।।*
*दही दूध चोरूनि दे सर्वांसी, ऐसे मज सांगताती ग ।।१।।*
*ते म्या ऐकीले नाही, म्हणुनिया मजवरी रुसलेलि ग ।।२।।*
*बळीराम तो ही त्यांसी मिळाला । तो ही माझा पक्षपाती ग ।।३।।*
*एका जनार्दनी पूर्ण कृपेने । भजू प्रेमे दिन राती ग ।।४।।*
*यशोदे घराकडे चाल मला जेऊं घाल गे जेऊं घाल.——-।।*
*जेविं बा सगुणा सख्या हो हरीं बा ।*
*आई! मज नको तुझी ब्रह्मज्ञान-रोटी ।*
*देसी तरी देऊ भक्ति-प्रेम-साखरवाटी ।।१।।*

श्रीकृष्ण म्हणतो आई मला काही नको फक्त मला पोटाी धर मग मिळाले.

भक्ती ज्ञान वैराग्याची मूर्ती म्हणजे आपली सद्गुरुमाता त्यांनी मिठी मारली की आपणातही ते तिन्ही उत्पन्न होतील मग त्याच्यासाठी योगायाग करायला नको.

*"भक्ति: परेशानुभवो विरक्तिरन्यत्र चैष मिक एक काल: ।।"*

तुष्टि पुष्ठि क्षुधानाश हे केवळ एक अन्नाची उडी घेतल्याने होते तसेच ह्या भक्ती करू लागला म्हणजे भक्ती ज्ञान वैराग्य हे एकरूप होतात. अशा रीतीने गुरुमाऊलिला आलिंगन दिले असता एकाच वेळी त्या तिन्हीची प्राप्ती होते. आता श्रीकृष्णाकडे आपण हेच मागू की भक्ती-ज्ञान-वैराग्याची प्राप्ती होऊन त्याचा आनंद भोगण्यास आम्हाला अधिकारी कर.

+++

# परमप्रिय गुरुवर्य श्रीभाईच्या प्रवचनांतील

## अमृत कण

१) निष्ठापूर्वक खऱ्या अर्थाने प्रचारक वृत्तीचे कार्यकर्ते असतील तर विनीच्या कार्यकर्त्यांच्या जिद्दीनेच संस्थेचे कार्य वाढविले जाते.

२) संस्थेच्या ठिकाणी एकनिष्ठता असणे हे कोणत्याही पारमार्थिक नित्यनेमाच्या बाबी एवढेच जरूरीचे आहे.

३) संघटना जिवंत झऱ्याप्रमाणे सदैव चढती वाढती व खेळती राहील अशी प्रत्येक सभासदाने दक्षता बाळगली पाहिजे.

४) मंडळीच्या सेवेत जर सभासदात उत्सुकता वाढत नाही तर पारमार्थिक अभ्यासक्रमात व्यत्यय येऊन यश पदरात पडणार नाही हे सर्वांनी आपल्या हृदयावर रेखीव कोरून ठेवावे. सेवेमध्ये कामचुकारपणा करणे म्हणजे केवळ अधमपणा होय हे एकमेव सत्य आहे. टाळाटाळ आणि अंगचुकारपणा मुळीच हितावर नाही.

५) गुरुमुखातून महावाक्याचे श्रवण करून देखील जर शिष्य कपटाने वागू लागला तर मेदरी टोपलीत पाणी साठविण्याचा प्रयत्न केल्याप्रमाणे त्याची स्थिती होईल. पदरात काहीच पडणार नाही.

६) पाण्यावाचून कोमेजणारे कमलपुष्प, मुळावाचून उन्मळून पडणारा महावृक्ष अथवा जीवनावाचून तडफडणारा मासा अशी जीवाची तगमग सद्गुरुमाते! तुजवाचून झाली आहे. तरी तुझ्या पवित्र सान्निध्यात म्या सदा असावे. तुझ्या निर्मळ मुखकमलाचे सदैव दर्शन घ्यावे अन् तुझ्या भक्तिप्रेमाने माझं अंत:करण वारंवार उचंबळून यावे हा एकच उदात्त हेतू प्रार्थनेपोटी असावा हीच दिव्यचरणी आर्त प्रार्थना.

७) लहानसहान दु:खासाठी लोक ढसढसा अश्रू ढाळतात पण आपले अंत:करण निर्मळ म्हणून रडणारे भाग्यवान अभावानेच सापडतात.

८) श्री सद्गुरुमाऊलीच्या लक्ष लक्ष आठवणी आपण आमच्या नसल्याची पावलोपावली जाणीव करून देतात. आपण असा एक विराट कल्पवृक्ष होता की ज्याने सुखदु:खाचे असंख्य उन्हाळे-पावसाळे सोसून स्वत:च्या पानापानावर मात्र गुलजार वसंत खेळवला!

९) अगदी सरळ मार्गाने जाणाऱ्या मनुष्यासही शत्रू असतात. खलपुरुष आकारण सज्जनांचे शत्रुत्व करतात. समाजात खल किंवा जात्याच दुष्ट अथवा वाकड्या वृत्तीचे लोक असतात. हे श्री ज्ञानेश्वरांसारख्या अजातशत्रु महाभागांनाही मान्य करावेच लागेल. त्यांच्या इतका सालस, समतोल विचार करणारा इतरांविषयी कणव असणारा, द्रव्याविषयी निरिच्छ इत्यादी गुणांनी मंडित महाभाग विरळाच.

+++

# विनंती

सद्भक्ती प्रकाश हे त्रैमासिक आजवर आपण इ.स. १९२८ सालापासून प्रसिद्ध करीत आहोत. सद्गुरु श्री भाई, श्री दादाभाई ह्यांचे आणि इतरही संतांचे विचार सर्वत्र प्रसारित होऊन, सद्भक्ती मंदिरातील घडामोडींचा आढावा आणि नजीकच्या काळात होणाऱ्या उत्सव-महोत्सवा विषयीची समग्र माहिती ह्या त्रैमासिकातून भक्तगणांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न ह्या नियतकालिकातर्फे आपण करीत असतो.

मुंबई शहराबाहेरील सभासदांना त्यांची प्रत पोस्टाने पाठवली जाते. तर स्थानिक सभासद सद्भक्ती मंदिरात येऊन आपापली प्रत घेऊन जातात.

गेल्या काही वर्षात छपाईच्या खर्चात प्रचंड वाढ झाली आहे. सभासदांकडून जी काही वर्गणी पूर्वी घेतली आहे ती त्या काळात योग्य अशीच होती किंवा असावी. मात्र आता त्या वर्गणीच्या रकमेमध्ये हा छपाईचा आणि पोस्टाचा खर्च अजिबात भागत नाही.

**सभासदांकडून अधिक वर्गणी मागण्याची सद्भक्ती प्रसारक मंडळींची इच्छा नाही.**

त्या ऐवजी अलीकडेच विकसित झालेल्या आपल्या वेबसाईटवर सद्भक्ती प्रकाश हे त्रैमासिक अपलोड केले जाईल.

ज्या सभासदांना इंटरनेटची सुविधा नाही किंवा इतर काही कारणामुळे वेबसाईट वरील माहिती वाचणे शक्य नसेल त्यांनी खालीलपैकी एखाद्या कार्यकर्त्यांशी संपर्क करावा. आपापले मोबाईल नंबर्स आणि ई-मेल अॅड्रेस (असल्यास) पाठवून द्यावेत.

ज्यांना हे शक्य आहे त्यांना विनंती आहे की त्यांनी देखील आपले मोबाईल नंबर्स आणि ई-मेल अॅड्रेस वर उल्लेख केलेल्या कार्यकर्त्यांपैकी कुणालाही पाठवून द्यावा, जेणेकरून जेव्हा त्रैमासिक अपलोड केले जाईल तेव्हा त्याची सूचना देता येईल.

**सर्व सभासदाना विनंती आहे की ह्या विनंतीच्या संदर्भात त्यांनी जरूर संपर्क साधावा.**

संपर्क :-

१. श्री. विवेक ताम्हाणे - दू. भ्र. क्र. ९८२०३५०८६७
२. श्री. नागानंद निळेश्वर - दू. भ्र. क्र. ९८२१२७०७७२
३. श्री. अरूण विजयकर - दू. भ्र. क्र. ९२२३२२२२४५

+++

।। श्री सद्गुरु प्रसन्न ।।

# (एप्रिल ते जून २०२१) महिन्यातील उत्सव व महोत्सव

यापुढे लॉकडाऊन व बंधन संपून आपण सर्वजण हे उत्सव साजरे करू शकू अशी आशा व श्री सद्गुरुंची प्रार्थना करूया :-

**चैत्र मास:**

| | | |
|---|---|---|
| मंगळवार | दि.१३.४.२०२१ (चैत्र शुद्ध प्रतिपदा) | गुढीपाडवा. प्रात: स्मरणाचेवेळी स्तवन व प्रार्थना. रात्री ९ वाजता श्री रामेश्वर मंदिरातर्फे पालखी मिरवणूक. |
| मंगळवार | दि.२०.४.२०२१ (चैत्र शुद्ध ८) (अष्टमी) | श्री लक्ष्मण महाराज व श्री नारायण महाराज (इंदूर) पादुका स्थापनेचा वर्धापन दिन. सकाळी स्तवन व प्रार्थना. |
| बुधवार | दि. २१.४.२०२१ (चैत्र शुद्ध ९) | श्री रामनवमी व श्री सोहिरोबा नाथ पुण्यतिथी. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना. श्री रामजन्मोत्सव दुपारी १२ वाजता पाळणा व इतर पदे. नंतर पालखी मिरवणूक. |
| मंगळवार | दि.२७.४.२०२१ (चैत्र पौर्णिमा) | श्री हनुमान जयंती. प्रात: स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना. जन्मोत्सव सकाळी ६.३० वाजता श्री रामेश्वर मंदिरातर्फे पालखी मिरवणूक रात्री ९ वाजता. |
| रविवार | दि. ९.५.२०२१ (चैत्र वद्य १३) | श्री अक्कल कोटस्वामी महाराज पुण्यतिथी दिन. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना. |
| मंगळवार | दि. ११.५.२०२१ (चैत्र वद्य १५) | गुरुमाता श्री पार्वतीमाता जयंती दिन. प्रात: स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना. |

वैशाख मास : **परमभगवद्भक्त श्री वामनपंडितांचा पुण्यतिथ्योत्सव**

| | | |
|---|---|---|
| शुक्रवार | दि. १४.५.२०२१ (वैशाख शुद्ध तृतीया) | सायंकाळी ५.३० नंतर हळदीकुंकू. अक्षय तृतीया श्री परशुराम जयंती. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना. |

| | | |
|---|---|---|
| सोमवार | दि. १७.५.२०२१ (वैशाख शुद्ध पंचमी) | आद्य शंकराचार्य व श्री रामानुजाचार्य जयंती सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना. |
| मंगळवार | दि. १८.५.२०२१ (वैशाख शुद्ध षष्ठी) | श्री वामन पंडितांचा पुण्यतिथी दिन. प्रात: स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना. ११.३० वाजता एकादशणी. त्यानंतर ब्राह्मण सुवासिनी संतर्पण. सायंकाळी ५ वाजता चरित्र वाचन व इतर पदे. रात्री ९ वाजता सद्भक्ती मंदिरातर्फे पालखी मिरवणूक. |
| बुधवार | दि. १९.५.२०२१ (वैशाख शुद्ध सप्तमी) | सायंकाळी ६ वाजता नामसंकीर्तन. |
| गुरुवार | दि. २०.५.२०२१ (वैशाख शुद्ध अष्टमी) | दुर्गाष्टमी. सायंकाळी ६ वाजता ध्वनिमुद्रित पदांचे श्रवण. रात्री ८ वाजता गुरुवर्य श्री भाईंचा शेजोत्सव व समाप्ती दिन. गुरुवरांनी आम्हां बालकांची सेवा मान्य करून घ्यावी व सर्व संकटांचे निवारण करून आम्हाला मंदिरात सेवेसाठी यावयास मिळावे. सद्गुरुंनी ती सोय करावी हीच विनम्र प्रार्थना. |
| मंगळवार | दि. २५.५.२०२१ (वैशाख शुद्ध १४) | श्री नृसिंह जयंती. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना. |

## गुरुवर्य श्री बाबांचा पुण्यतिथ्योत्सव

| | | |
|---|---|---|
| बुधवार | दि. ९.६.२०२१ (वैशाख वद्य १४) | गुरुवर्य श्री बाबांचा पुण्यतिथी दिन. प्रात: स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना. ११.३० वाजता एकादशणी. त्यानंतर ब्राह्मण सुवासिनी संतर्पण. सायंकाळी ५.३० वाजता चरित्र वाचन. 'पितापुत्र व गुरुशिष्य प्रेम' या प्रवचन वाचनास प्रारंभ. |

| | | |
|---|---|---|
| शुक्रवार | दि. ११.६.२०२१ (ज्येष्ठ प्रतिपदा) | गंगादशहरा प्रारंभ. सायंकाळी ६ वाजता हळदीकुंकू समारंभ. |
| शनिवार | दि. १२.६.२०२१ (ज्येष्ठ २) | सायंकाळी ६ वाजता नाम संकीर्तन. |
| रविवार | दि. १३.६.२०२१ (ज्येष्ठ ३) | गुरुवर्य श्री बाबांच्या ध्वनिमुद्रित पदांचे श्रवण. उत्सव समाप्ती. गुरुवरांनी आम्हा अज्ञ बालकांची सेवा गोड मानून घ्यावी अशी कळकळीची प्रार्थना. |
| रविवार | दि. २०.६.२०२१ (ज्येष्ठ शुद्ध १०) | गंगावतरण दिन. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना. |
| सोमवार | दि. २१.६.२०२१ (ज्येष्ठ शुद्ध ११) | श्री निवृत्तीनाथ पुण्यतिथी दिन. प्रात: स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना. |
| **आषाढ मास : (जुलै ते सप्टेंबर २०२१) महिन्यातील उत्सव व महोत्सव** | | |
| मंगळवार | दि. २०.७.२०२१ (आषाढी एकादशी - देवशयनी एकादशी) | सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना. |
| शुक्रवार | दि. २३.७.२०२१ (आषाढी पौर्णिमा - गुरुपौर्णिमा) (व्यास पौर्णिमा) | गुरुपौर्णिमा. प्रात: स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना. ११.३० वाजता पादुकांस एकादशणी. त्यानंतर महाप्रसाद. सायंकाळी ५.३० वाजता परमार्थदीपिका वाचन. |
| रविवार | दि. २५.७.२०२१ (आषाढी वद्य द्वितीया) | परमप्रिय सद्गुरु श्री दादाभाई जयंती. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना. सकाळी १० वाजता जन्मोत्सव. पाळणा व इतर पदे. ११.३० वाजता एकादशणी. सायंकाळी ५.३० वाजता चरित्र वाचन. रात्रौ ८.३० वाजता शेजोत्सव. |

| | | |
|---|---|---|
| सोमवार | दि. २६.७.२०२१<br>(आषाढी वद्य तृतीया ) | नामसंकीर्तन. |
| बुधवार | दि. २८.७.२०२१<br>(आषाढी वद्य पंचमी ) | आद्य सद्गुरु श्री नारायण महाराज पुण्यतिथी व जयंतीदिन. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना. ११.३० वाजता एकादशणी. त्यानंतर ब्राह्मण सुवासिनी संतर्पण व महाप्रसाद. सायंकाळी ५.३० वाजता चरित्र वाचन. |
| गुरुवार | दि. २९.७.२०२१<br>(आषाढी वद्य षष्ठी ) | सायंकाळी ५.३० वाजता सद्गुरु नारायण महाराज व सद्गुरु दादाभाई विरचित ध्वनिमुद्रित पदांचे श्रवण व समाप्ती दिन. कळकळीची विनंती. |
| **ऑगस्ट :** | | |
| रविवार | दि. १.८.२०२१ | इंग्रजी तारखेनुसार गुरुवर्य श्री भाईंचा जयंतीदिन. |
| शुक्रवार | दि. ६.८.२०२१<br>(आषाढी वद्य त्रयोदशी ) | श्री नामदेव महाराज पुण्यतिथी. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना. |
| शनिवार | दि. ७.८.२०२१<br>(आषाढी वद्य चतुर्दशी ) | श्री सावतामाळी पुण्यतिथी दिन. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना. |
| **श्रावणमासारंभ :** | | |
| बुधवार | दि. १८.८.२०२१<br>(श्रावणशुद्ध ११)<br>(पुत्रदा एकादशी) | गुरुवर्य श्री भाईंची जयंती. प्रात: स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना. ११.३० वाजता एकादशणी. सायंकाळी ५ वाजता चरित्र वाचन व इतर पदे. सायंकाळी ७.४७ वाजता जन्मोत्सव, पाळणा व इतर पदे. |
| रविवार | दि. २२.८.२०२१<br>(श्रावण पौर्णिमा - नारळी पौर्णिमा) | श्रावणी व होमहवन इत्यादी. |

| | | |
|---|---|---|
| सोमवार | दि. २३.८.२०२१ (श्रावण वद्य प्रतिपदा) | श्री सिद्धारूढ स्वामी पुण्यतिथी दिन. सकाळी स्तवन व प्रार्थना. |
| रविवार | दि. २९.८.२०२१ (श्रावण वद्य सप्तमी) | श्री लक्ष्मण महाराज पुण्यतिथी दिन. प्रात: स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना. सायंकाळी ५.३० वाजता चरित्र वाचन. |
| सोमवार | दि. ३०.८.२०२१ (श्रावण वद्य अष्टमी) | जन्माष्टमी श्री कृष्ण जयंती. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना. श्रीकृष्ण जन्मोत्सव रात्रौ १२ वाजता. रात्री १० ते १२ श्री रमा वल्लभदासांची पदे व त्यानंतर जन्म व पाळणा व पदे, प्रार्थना. |
| मंगळवार | दि. ३१.८.२०२१ (श्रावण वद्य नवमी) | गोपाळकाला. सद्भक्ती मंदिराचा वर्धापन दिन. प्रात: स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना. ११.३० वाजता एकादशणी व इतर पदे. |
| **भाद्रपद मास :** | | |
| शुक्रवार | दि. १०.९.२०२१ (भाद्रपद शुद्ध चतुर्थी) | श्री गणेश चतुर्थी. स्तवन व प्रार्थना. |
| शुक्रवार | दि. १७.९.२०२१ (भाद्रपद शुद्ध ११) | श्री निरंजन रघुनाथ स्वामी महाराज पुण्यतिथी दिन. सकाळी स्तवन व प्रार्थना. |
| मंगळवार | दि. २१.९.२०२१ (भाद्रपद वद्य प्रतिपदा) | सद्गुरु श्री दादाभाई महालय दिन. प्रात: स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना. ११.३० वाजता एकादशणी. |

+++

# शोकवृत्त

कळविण्यास दु:ख होत आहे की आपले गुरुबंधू प्रदीप बा. ताम्हणे ह्यांना अल्पशा आजारानंतर हृदय विकाराने दि. २४ फेब्रुवारी २०२१ रोजी पुणे येथे देवाज्ञा झाली. त्यांचा जन्म ८ ऑक्टोबर १९५२ रोजी अंधेरी, मुंबई येथे झाला. वै. र. गो. ताम्हणे, ज्यांनी प. पू. श्रीभाईंच्या संगतीत सद्भक्ती मंदिराची सेवा जीवनाच्या अंतापर्यंत केली. त्यांचा प्रदीप हा नातू. सद्भक्ती मंदिराच्या आवारात आऊट हाऊसमध्ये रहात असल्यामुळे बालपणापासूनच सद्भक्ती मंदिरात वागडायला मिळाले. प्रदीप, ती. बाळकृष्ण व ती. कुमुदिनी ह्यांचा द्वितीय पुत्र होय. प.पू. श्री दादाभाईंनी त्याचे नाव गोपाळकृष्ण ठेवले होते. त्यामुळे लाडाने सर्वजण त्याला गोपाळी ह्या नावाने जास्त ओळखत होते. २०१० पर्यंत त्यांचे वास्तव्य जोगेश्वरी येथे होते. पण नंतर ते पुण्याला स्थलांतरीत झाले. तरी जसे जमले तसे ते मंदिराच्या उत्सवाला हजर रहात होते. ते पेशाने Architect होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगी, सून, नातू ह्यांना सोडून ते निजधामास गेले. सद्भक्ती प्रसारक मंडळीचे सर्व सभासद त्यांच्या कुटुंबियांच्या दु:खात सहभागी आहेत.

+++

# महत्वाच्या सूचना

ह्या अंकातील आणि ह्या आधीच्या अंकातील उल्लेख केलेले उत्सव - महोत्सव आपल्या सद्भक्ती मंदिरातील प्रथेनुसार देण्यात आलेले आहेत. परंतु विद्यमान सरकारी आदेश आणि त्याप्रमाणे पाळण्यात येणारा लॉक डाऊन ह्यामुळे जून ते डिसेंबर महिन्यातील उत्सव थोडक्यात आणि अल्पावधीत फक्त गुरुजींच्या हस्ते आणि एक किंवा दोन मदतनीस भक्तांच्या उपस्थितीत साजरे करावे लागले होते.

तसेच पुढील उत्सव सालाबादप्रमाणे साजरे केले जाणार की वर उल्लेख केल्याप्रमाणे थोडक्यात ओटोपते घ्यावे लागणार हे त्या त्या वेळेस जाहीर केल्या जाणाऱ्या सरकारी आदेशांवर अवलंबून असेल. सद्य परिस्थितीत सरकारी आदेशानुसार कोणताही उत्सव अत्यंत छोट्या प्रमाणात, म्हणजे केवळ गुरुजी आणि एक किंवा दोन मदतनीस भक्तांच्या उपस्थितीत साजरा करावा लागणार आहे. पुढील सूचना येईपर्यंत तरी सर्व भक्तांना विनंती आहे की ह्या पुढील उत्सवांच्या तारखांच्या एक किंवा दोन दिवस आधी त्यांनी खालीलपैकी एखाद्या भक्ताशी संपर्क करून नंतरच सद्भक्ती मंदिरात दर्शनाला यावे, जेणेकरून सद्भक्तांची निराशा आणि गैरसोय होणार नाही.

१. श्री. नागानंद निळेश्वर - दू. ध्व. क्र. ९८२१२७०७७२
२. श्री. समीर रायकर - दू. ध्व. क्र. ९८२००८४०३०
३. श्री. रोहन दळवी - दू. ध्व. क्र. ९८६७४९४७४७
४. श्री. अरूण विजयकर - दू. ध्व. क्र. ९२२३२२२२४५

**टीप** : उत्सवाचे वेळी सध्या आपले माननीय गुरुजी पहाटे सूर्योदयसमयी गाभाऱ्यात, आतल्या आत श्री दत्तगुरुंची नित्यपूजा करतात आणि सर्व पादुकांना अभिषेक करतात. भक्तमंडळी आपापल्या घरी नामस्मरण, वाचन करतात. सरकारी आदेशानुसार भक्तांना दर्शनाकरिता मंदिरात सध्या प्रवेश नाही.

दररोज श्री दत्तगुरुंची नित्यपूजा माननीय गुरुजी पहाटे सूर्योदय समयी करतात. सरकारी नियमाचे पालन करूनच इतर सेवा शक्य तितक्या केल्या जातात.

## : निवेदन :

अनेक भाविकांना आपल्या सद्भक्ती मंदिराकरिता काहीतरी आर्थिक सेवा करण्याची इच्छा असते. जे जवळपास राहतात ते मंदिरात प्रत्यक्ष येऊन रोख रक्कम किंवा चेक देतात. पण आपले बरेचसे सद्भक्त दूरवर राहतात. काही मुंबई बाहेर, काही महाराष्ट्रा बाहेर तर काही परदेशात आहेत.

ह्या सर्वांना सोईचे व्हावे म्हणून आता Net Banking तर्फे सेवाशुल्क स्वीकारायला सुरूवात केली आहे. अशा प्रकारचा व्यवहार करण्याकरिता लागणारा तपशील खालील प्रमाणे आहे :-

| | |
|---|---|
| **Name of the account** | : Sadbhakti Prasarak Mandali |
| **Account No** | : 00610010000130 |
| **Bank Name** | : NKGSB Co.Op. Bank Ltd. |
| **Branch** | : Jogeshwari (East), Mumbai - 400 060. |
| **IFSC Code No.** | : NKGS0000006 |

उपरोक्त विषयासंबंधी काही अधिक माहिती हवी असल्यास खालील व्यक्तींशी संपर्क साधावा :-

| | |
|---|---|
| १. श्री. विवेक ताम्हाणे | भ्रमणध्वनी : ९८२०३५०८६७ |
| २. श्री. नागानंद निळेश्वर | भ्रमणध्वनी : ९८२१२७०७७२ |
| ३. श्री. अरूण विजयकर | भ्रमणध्वनी : ९२२३२२२२४५ |

।। श्री सद्गुरु प्रसन्न।।

# — मंगला चरण —

पद

गाईये गणपती जगवंदन । शंकर सुमन भवानिनंदन ।।
सिद्धीसदन गजवदन विनायक । कृपासिंधू सुंदर सबलायक ।।१।।
मोदकप्रिय मुद मंगलदाता । विद्यावारिधि बुद्धि विधाता ।।२।।
मागत तुलसीदास कर जोरे । वसहि रामसिय मानस मोरे ।।३।।

सर्वात्मभावे वंदन

(१) श्लोक

सजयति सिंदुरवदनो देवो यत्पादपंकज स्मरणम् ।
वासरमणि: इव तमसां नाशयति विघ्नानाम् ।।
अभिदजलयदनिवहं भ्रमरकुनीक सेवित कपोलय् ।
अभिमत फळदातारं कामेश गणपती वंदे ।।

(२) श्लोक

गुरुर्ब्रम्हा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वर ।
गुरु साक्षात् परब्रह्म तस्मै: श्री गुरवे नम: ।।

(३) श्लोक

नारायणं नमस्कृत्यं नर चैव नरोत्तमम् ।
देवई सरस्वती व्यासं ततो जयमुदीरयेत् ।।

संपादिका : सौ. निर्मला चंद्रशेखर काळे